# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

☏ २५६५६२३४ Email:ropune@dtemaharashtra.gov.in Web Site :- www.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/ 4560 दिनांक :- 06 NOV 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी . पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत..

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र 18/तशिस/डीबीटी/2019/492 दिनांक 05/11/2019

शैक्षणिक वर्ष २०१९-२० आपले सरकार डी.बी.टी पोर्टल (संकेतस्थळ https://mahadbtmahait.govt.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनायामार्फत राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भता योजना
३. राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना (भाग -१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त निर्देशानूसार सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, महाडीबीटी पोर्टल वर जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दि १५/११/२०१९ पर्यंत मुदतवाढ व संस्थांना तपासणीसाठी दि ३०/११/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी या मुदतवाढीपर्यंत सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून संस्थांनी अर्ज भरुन घ्यावेत व संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये (**Clerk/Principal Login**) विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता निकाली काढावेत. यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही आणि जर यानंतर कोणतेही अर्ज तपासणीसाठी प्रलंबित राहीले तर याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्याची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थी केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल यबाबत संस्थांनी दक्षता घ्यावी. विद्यार्थी दोन-दोन योजनांचा लाभार्थी आढळला तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखाची राहील यांचीसुध्दा गंभीरतेने नोंद घ्यावी.

६.११.१९

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे